# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ११
# सभा क्र.१४, दिनांक १७/०६/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब सभा (शुक्रवार, दि. १३/०६/२०२५ रोजीची) मंगळवार, दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. नवल किशोर राम | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा.ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि) |
| मा.पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (ज) |
| मा.प्रदीप चंद्रन | – | अति.महा.आयुक्त (इ) |
| मा.सौ.योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा.सौ.उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. डॉ. संजीव वावरे | – | सहा.आरोग्य प्रमुख |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. नंदकिशोर जगताप | – | मुख्य अभि.(पा.पु.) |
| मा. युवराज देशमुख | – | मुख्य अभि.(भवन) |
| मा. सौ. मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |
| मा. ॲड.निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकारी |
| मा.संदीप कदम | – | उप आयुक्त (घ.क.व्यव.) |
| मा.संतोष वारूळे | – | उप आयुक्त (पर्यावरण) |
| मा.अशोक घोरपडे | – | मुख्य उद्यान अधिक्षक |
| मा. राहुल जगताप | – | माहिती व तंत्रज्ञान प्रमुख |
| मा. सौ.सुनंदा वाखारे | – | शिक्षणाधिकारी (माध्य.व तांत्रिक) |
| मा. सौ. उबाळे | – | प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ ) |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.
नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

**<u>वृत्तांत कायम करणे</u>**

मा. स्थायी समिती सभा क्र. ११, दि. २९/०५/२०२५, सभा क्र. १२, दि. ०६/०६/२०२५ व सभा क्र. १३, दि. १३/०६/२०२५ असे एकूण ३ वृत्तांत कायम करण्यात आले.

**<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>**

**<u>घनकचरा व्यवस्थापन आढावा</u>**

**विषय क्र.२१४**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०५/२०२५ ते दि.३१/०५/२०२५ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का./१२८७, दि.०४/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**<u>उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा</u>**

**विषय क्र.२१५**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ कार्यालयाचे नियंत्रणाखालील ढोले-पाटील, येरवडा कळस धानोरी, व नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची <u>माहे मे २०२५</u> चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.१/२३४, दि.०९/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**<u>माहितीसाठी आलेले विषय</u>**

**विषय क्र.२१६**

दिनांक १२/०५/२०२५ ते दिनांक १८/०५/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ३४ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२३२, दि.०६/०६/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

<u>सर्वात कमी रकमेचे टेंडर्स</u>

**विषय क्र.२१७**

कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र.१ यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांपैकी कोळेवाडी, भिलारेवाडी, गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी व लगतच्या भागात मागणीनुसार टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GUJAR WATER SERVICES यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९,९९,०२५/- पेक्षा १.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९८,८९,०३५=७३ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९८,८९,०३५=७२ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक ( २४-०४-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९८,८९,०४०) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२२६, दि.०५/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२१८**

हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Madhav Water Suppliers यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२,७९,१७,५००/- पेक्षा ०.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,७९,१७,५००/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२,७९,१७,५००/- तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (२२-०४-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२,७९,१७,५००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२३०, दि.०६/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२१९**

लोहगाव येथे टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. VISHAL TRANSPORT यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९,९९,५८०/- पेक्षा ३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९६,९९,५९२=६ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९६,९९,५९२=६ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (२६-०३-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९६,९९,५९३) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२३१, दि.०६/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२२०**

मांजरी जलशुद्धीकरण केंद्र चालविणेसाठी सेवक पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Shree Samarth Electricals Engineers and Contractors यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९७७४१६०/- पेक्षा -०.०००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९७७४१६०/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९७७४१६०/- तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.५००००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२३३, दि.०६/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>मागील सभेचे विषय</u>

**विषय क्र.२२१**

डीबीओटी तत्त्वावर अ) शिवणे ते म्हात्रे पूल (फेज-१) व ब) संगमवाडी ते खराडी (फेज-3) नदीकाठचा डीपी रस्ता डिफर्ड पेमेंट पद्धतीने विकसित करणे या कामामधील ठेकेदार यांनी दाखल केलेल्या नुकसान भरपाई दावा प्रकरणी ठेकेदार में पटेल इंजिनिअरिंग लिमिटेड यांचे समवेत करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१०१, दि.०९/०५/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार एक महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.०९/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – एक महिना पुढे घ्या.

**निर्णय – सदर विषयाचा विचार एक महिन्यानंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.२२२**

प्राथमिक शिक्षण विभागाकडील असणाऱ्या शाळेलगत इयत्ता ८वी, ९वी, व १०वी चे वर्ग व ज्युनिअर कॉलेज सुरु करणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक/१५९, दि.२७/०५/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.०६/०६/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**संकीर्ण**

**विषय क्र.२२३**

१) पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सुमारे १०३ कि. मी. लांबीचे एकूण ३२३ रस्ते किमान ९.० मी. रुंद करण्याचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या स्तरावर विचाराधीन होता. त्यास अनुसरून स्थायी समिती, पुणे महानगरपालिका यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २१०(१) (ब) मधील तरतूदीस अनुसरून सदर प्रस्तावास मान्यता घेण्याच्या दृष्टीकोनातून जाहिर प्रकटनाव्दारे नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यास ठराव क्र.२२२, दि.०९/०६/२०२० अन्वये उपसूचनेसह मान्यता दिलेली आहे.

२) सदर रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २१०(१) (ब) मधील विहित तरतूदीनुसार झाला नसल्याने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत रस्त्यांच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव सदर नियमातील तरतुदीनुसार विहित प्रक्रिया पार पाडून करण्यासाठी मा. स्थायी समिती, पुणे महानगरपालिकेचा सदर ठराव क्र.२२२, दि.०९/०६/२०२० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ (३) मधील तरतूदीनुसार विखंडीत करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.पीएमसी-२०२०/प्र.क्र.१८८/नवि-२२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक-५जून २०२५ रोजी चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.२२४त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.१५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.१५०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/२३७, दि.१२/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२२५त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.३५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.१५०.०० कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/२३८, दि.१२/०६/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

सही /– xxx
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दि. १८/०७/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

सही /– xxx
**(नवल किशोर राम)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**